सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# वादळ अन् गारांसह सोलापुरात तुफान 'पाऊसधारा'






## फळबागांसह भाजीपाल्यांची हानी

## चिमुकल्यांनी घेतला पावसात भिजण्याचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

एप्रिल महिन्यात तापमानाचा टक्का वाढत जावून ४३ अंशाच्याही पुढे गेला होता. यामुळे सोलापुरातील नागरिकांना प्रचंड उकाडा सहन करावा लागत होता. मंगळवारी वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाल्याने हवेत गारवा निर्माण झाला. या पावसाने फळबागांसह भाजीपाल्यांची हानी होणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, चिमुकल्यांनी पावसात भिजण्याचा आनंद घेतला.गेल्या ३-४ दिवसांपासून वातावरणात बदल झाला आहे. गतवर्षी मे महिन्याच्या १५ तारखेला तुफान पाऊस झाल्याने मे महिन्यातच नदी-नाले, विहिरी ओसंडून वाहत होत्या. यंदा तर १९ एप्रिलपासूनच पाऊस चालू झाल्याने हवामान विभागाचे अंदाज चुकू लागले आहेत. शेतकऱ्यांचेही पिकांचे नियोजन चुकत आहेत. सोलापूर शहरात मंगळवारी ५ वाजेपासून पाऊस झाला आणि काही भागात गारांचा तुफान पाऊस पडला.

अर्धा/पाऊण तास जोरदार झालेल्या या पावसामुळे वाहनचालक आणि चाकरमान्यांचे हाल झाले. वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी विजेचे पोल पडणे, विजा पडणे, झाडे उन्मळून पडणे अशा घटना घडल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अक्कलकोटमध्ये ढगफुटीसदृश पावसाने शेतं पाण्याखाली गेली आहेत.

### मशागतीचा काळ, पावसाची घाई

सध्या खरीप हंगामाची पेरणीपूर्व तयारी शेतकरी करु लागले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी सुगी आटोपून शेतात नांगरणी, फणणे, रोटर मारणे, खते टाकणे, कुळवणे आदी मशागतीची कामे चालू केली आहेत. रब्बी हंगामाची उशिराने पेरणी झालेले शेतकरी सध्या सुगी काढून घेण्याच्या नादात असताना अवकाळीचा पाऊस विनाकारण घाई करत आहे, असे दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव येथील सागर शिंदे यांनी सांगितले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील गंगेवाडी, उळे व कासेगाव परिसरातील काही भागांत रविवारी दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस झाला असून, वीज कोसळून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटनाही घडली आहे. उशिराने पेरणी झालेली ज्वारी, मका, गहू आदी पिकांनाही या पावसाचा मोठा फटका बसला आहे. कडबा भिजल्याने अनेक ठिकाणी ज्वारी पिक काळे पडून शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

अजूनही एक-दोन दिवस जिल्ह्यात यलो अलर्ट असून, काही ठिकाणी विजांच्या कडकडाटात पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि वीज कोसळण्याची शक्यता असल्याने जिल्ह्याच्या आपत्ती विभागाने दिलेल्या सुचनांचे सर्वांनी पालन करावे, असेही आवाहन जिल्हा प्रशासन आणि मंत्रालय स्तरावरुन नागरिकांना करण्यात आले आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### पैसे देण्याच्या कारणावरुन दगड, लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

बोकडाचे पैसे देण्याच्या कारणावरून एकास दगड, लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी मंगेश महादेव कांबळे, शुभम महादेव कांबळे आणि विजय काटकर (सर्वजण रा.संतोष नगर, बाळे, सोलापूर) या तिघा जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत प्रथमेश भीमराव क्षीरसागर (रा.संतोष नगर बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते सोमवारी सायंकाळी बाळे येथील कुलस्वामिनी मटन व चिकन शॉप येथे असताना वरील आरोपींनी बोकडाचे पैसे देण्याचे कारणावरुन दगड, लाथाबुक्क्याने मारहाण केली. पोलिस हवालदार ढोबळे हे पुढील तपास करीत आहेत.

### महिला वाहकाला शिवीगाळ, मारहाण

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

तिकीट काढण्याच्या कारणावरून बसच्या एका महिला वाहकाला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना घडली. याबाबत साधना अशोक अनंतवाळ (रा.उदगीर, जि.लातूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन काजल नागराज साबळे, कुशाला गौतम डावरे (रा.मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) या दोन महिलांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हे सोमवारी दुपारी अडीच वाजता सोलापूर ते उदगीर बस (क्रं. एम.एच.२४ ए.यु.७९७४) मधुन प्रवासी बसमध्ये वाहक म्हणून सेवेत होत्या. सदर बस जुना तुळजापूर नाका येथे आली असता बसमध्ये बसलेल्या वरील आरोपींना फिर्यादीने तिकीट काढण्याबाबत विचारले असता त्यांनी फिर्यादीस आमच्याकडे पैसे नाहित बस थांबवा असे म्हणून आरडा ओरड केली. त्यावेळी फिर्यादी त्यांना समजावून सांगत असताना आरोपींनी अरेरावीची भाषा करून फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. त्यानंतर आरोपी हे बसमधून खाली उतरुन बसवर दगड मारुन काच फोडली. बस जाळून टाकते, अशी धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे. पोलिस हवालदार दुधाळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### जयंती मिरवणुकीत एकास मारहाण; दहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

किरकोळ कारणावरून एका तरुणाला लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केल्याप्रकरणी १० जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संकेत चंदनशिवे, रोहन गायकवाड, संदेश झेंडे व इतर ७ ते ८ अज्ञात इसम अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

याबाबत मनोज बाबासाहेब कांबळे (रा.संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. मनोज कांबळे हे रविवारी मध्यरात्री संभाजीराव शिंदे शाळेजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मिरवणुकीत असताना पी.एन.ग्रुपच्या शोभायात्रेत वरील आरोपींनी विनाकारण हाताने, लाथाबुक्यांनी मारहाण केली.

एका आरोपीने कोणत्यातरी वस्तुने डोक्यात मारल्याने जखम झाली आहे. गळ्यातील सोन्याची लॉकेट गहाळ झाले आहे, असेही फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस नाईक कामुर्ती हे पुढील तपास करीत आहेत.

## तक्रार प्रलंबित ठेवल्या प्रकरणी ४७ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

### एकूण ३७ हजार ७०० रुपये दंडाची आकारणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेने एकूण ४७ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून एकूण ३७ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले आहेत.



महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत प्राप्त अर्जावरून विविध विभागातील १६ कर्मचाऱ्यांना एकूण २६ हजार ६०० रुपये दंड आकारला आहे. आपली तक्रार/ माय सोलापूर प वरील अर्जाचा निपरा वेळेत न केल्याने विविध विभागातील ३१ कर्मचाऱ्यांना ११ हजार १०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड त्यांच्या एप्रिल २०२६ पेड इन मेच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे.

## मॉरिशस येथील शांती परिषदेसाठी डॉ.महावीर शास्त्री दाम्पत्याना आमंत्रण




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

पोर्ट लुईस येथे ७ व ८ मे रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शांतता परिषदेसाठी सोलापुरातील डॉ.महावीर शास्त्री व डॉ.माधुरी शास्त्री यांना विशेष व्याख्यानासाठी आमंत्रण प्राप्त झाले आहे.आर्य सभा पेम्पलमाउसेस या मॉरिशसच्या राजधानीतील संस्थेद्वारे या परिषदेचे आयोजन केले गेले आहे. विविध देशातील प्रतिनिधींना यामध्ये आमंत्रित करण्यात आले आहे.

भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी एप्रिल महिन्यात ९व्या हिंदसागर परिषदेसाठी उपस्थिती दर्शवली. या भेटीतील चर्चेनुसार शांती परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ मॉरिशसच्या समाज शास्त्र विभागातर्फे भारतीय उपखंडातील भाषांचा मॉरिशसच्या जीवनावर प्रभाव या विषयावर डॉ.महावीर शास्त्री यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

आर्य सभेतर्फे आयोजित केलेल्या ब्राम्ही लिपी शिबिरात डॉ.माधुरी शास्त्री यांचे व्याख्यान होणार आहे. परिषदेचे आमंत्रण स्वीकारल्याबद्दल अध्यक्ष डॉ.वि.सितालो यांनी पत्राद्वारे हर्ष व्यक्त केला.

## जुनी पेन्शन योजनेसाठी सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर

### जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर विविध घोषणांनी दणाणला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी सकाळी जुने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी हातात फलक घेऊन घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

प्रलंबित मागण्यांबाबत सरकारने वारंवार आश्वासने दिली. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी नाराजी यावेळी व्यक्त करण्यात आली. राज्यातील लाखो कर्मचारी शासनाच्या निर्णयाच्या प्रतीक्षेत असून, सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

सरकारने संवेदनशीलता दाखवून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आगामी काळात आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ घोषणाबाजीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस बंदोबस्तात आंदोलन शांततेत पार पडले.

या आंदोलनात राजीव साळुंखे, अमृत कोकाटे, शंतनु गायकवाड, अशोक इंदापुरे यांच्यासह विविध कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी, सदस्य आणि सरकारी निम सरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सामील झाले होते.

### या आहेत प्रमुख मागण्या

निवृत्ती वेतन योजना तातडीने लागू करणे, रिक्त पदभरती प्रक्रिया सुरु करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या देणे, कर्मचाऱ्यांचे इतर सेवाविषयक प्रश्न सोडविणे या प्रमुख मागण्या आहेत, असे संघटनेचे नेते अशोक इंदापुरे यांनी सांगितले.

### राष्ट्रीय निवृत्ती वेतन जाहीर परंतु...

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहिर करुन शासनाने महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी-शिक्षकांना दिलासा दिला. परंतु सदर योजना कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटी, नियम व कार्यपध्दती संदर्भातील अधिसूचना किंवा परिपत्रक अद्याप पारित केलेले नाही.

### कर्मचाऱ्यांचे भवितव्य टांगणीला

सदरची योजना १ मार्च २०२४ पासून लागू झाली असल्यामुळे दि.१ मार्च २०२४ पासून आजपर्यंतच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन संदर्भातील भवितव्य अद्याप टांगणीला लागलेले आहे. संबंधितांना तात्पुरते निवृत्ती वेतन देखील प्राप्त झालेली नसल्याचं सांगण्यात आले.

## जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी १२ कोटींचा आराखडा

**४४ गावांत २४६ टँकरचे नियोजन**

**पावसाळ्यापूर्वी जीर्ण इमारतींची दुरुस्ती**

**शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र दुरुस्तीला गती**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने व्यापक नियोजन सुरू केले असून, त्याचबरोबर अंगणवाडी शाळा, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या दुरुस्ती कामांनाही गती देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी १२ कोटी ४ हजार १० रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला. एप्रिल ते जून या कालावधीत २४६ टँकरचे नियोजन करण्यात आले आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले गावात ३२ हजार लिटरच्या एका खाजगी टँकरद्वारे दररोज दोन फेऱ्यांत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. याबैठकीत पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील अंगणवाडी शाळा, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि शाळांच्या इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्या ठिकाणी इमारती अत्यंत जीर्ण, धोकादायक किंवा बिकट अवस्थेत आहेत, त्या ठिकाणी संबंधित बांधकाम पाडून नव्याने इमारत उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश उपाध्यक्ष पवार यांनी अभियंता व कनिष्ठ अभियंत्यांना दिले.

### आढावा घेऊन दिल्या सूचना



सोलापूर जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा आढावा घेऊन ४४ गावांमध्ये एप्रिल ते जून दरम्यान टँकरची मागणीनुसार आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यातील विविध अंगणवाडी, आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि शाळा यांच्या इमारतीसंबंधी दुरुस्ती देखभाल तसेच नूतनीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी सांगितले.

### तालुकानिहाय प्रस्तावित टँकर मागणी आराखडा

बार्शी २३, अक्कलकोट ४४, करमाळा २७, माढा २५, मंगळवेढा ५, उत्तर सोलापूर ९, दक्षिण सोलापूर ३९, पंढरपूर १७, सांगोला १०.


गुळवंची येथील आरोग्य उपकेंद्र तसेच मंद्रूप येथील अंगणवाडी इमारतीच्या स्थितीचा विशेष आढावा घेण्यात आला. संबंधित आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, वरिष्ठ अभियंते व कनिष्ठ अभियंते यांनी समन्वयाने पाहणी करून तातडीने अहवाल सादर करावा, असे सांगण्यात आले. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. उपकेंद्र अंगणवाडी आणि शाळा सुरक्षिततेच्या दृष्टीने हा अहवाल महत्त्वाचा असून, आवश्यक त्या इमारतींवर तातडीने कारवाई करण्यात येणार आहे.

## खा. डॉ.प्रा. ज्योती वाघमारे यांची निवड

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**



भारत सरकारने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती देशपातळीवर साजरी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय राष्ट्रीय समितीची स्थापना केली आहे. या समितीवर सोलापूरच्या कन्या आणि राज्यसभा खासदार डॉ.प्रा.ज्योती वाघमारे यांची 'सदस्य' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने अधिकृत राजपत्राद्वारे ही घोषणा केली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील या समितीत देशभरातील मोजक्या १२५ मान्यवरांचा समावेश आहे. या नियुक्तीमुळे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.



## ज्ञानामृत आनंदलहरी १४१९

**नवसें कन्यापुत्र होती । तरी कां करणें लागे पती ।।**

तुमच्या आमच्यासह जगाच्या पाठीवर असा एकही व्यक्ती सापडू शकत नाही की ज्याला कसल्याही प्रकारचे कर्म करण्याची गरज नाही. अर्थात निसर्गत: कांही कर्म ही प्रत्येकावर बंधनकारक आहेत. त्याचप्रमाणे आपले इच्छित, ध्येय, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विशिष्ट व योग्य अशी कर्म ही करावीच लागतात. मी कर्मच करणार नाही आणि माझे ध्येय साध्य करेन असे म्हणून चालत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर केवळ दैववादी किंवा अंधश्रध्दात्मक वृत्ती जोपासून वागणे अत्यंत चुकीचे असते. एखाद्या देव-देवतांना नवस बोलल्याने किंवा वस्तु, दान, पैसा भेट देण्याने किंवा बळी देण्याने कांही होत नसते. आपल्या साध्यतेसाठी कष्ट ही करावीच लागतात. मूल-बाळ व्हावे म्हणून नवस बोलला तरी कुमारीकेला किंवा पती नसलेल्या स्त्रीला मूल होणे शक्य नसते. स्त्रीच्या उदरात मूलाची उत्पत्ती होण्यासाठी तिला पतीशी समागम करावाच लागेल. हे सत्य असतांनाही लोक नवसातून पुत्र प्राप्ती होईल अशी खुळचट कल्पना जोपासतात. नको त्या पध्दतीने नवस बोलतात व तो फेडण्याचा प्रयत्न करतात. या अनुषंगाने प्रश्नात्मक वाक्यस्वरुपात बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**नवसे कन्यापुत्र होती ।**
**तरी कां करणें लागे पती ।।**

संत तुकाराम महाराजांची वाणी ही अत्यंत परखड आहे. ही वाणी अनुभवणारा अंधश्रध्देच्या जगात जगणारच नाही. तुकोबांची वाणी आपणाला कर्तव्यतत्पर बनविणारी आहे. मूल होणे न होणे हे दैवाच्या हाती नाही तर ते आपल्या हाती आहे. दुर्देवाने शरीर रचना योग्य नसेल, म्हणजे पती-पत्नीमध्ये नैसर्गिकरित्या कांही दोष असेल तर त्याला नाईलाज आहे. अशा दोषयुक्त जोडप्यांनी कितीही नवस केले तरी पुत्र प्राप्ती होत नाही. त्यांना वैद्यकीय सल्लयाशिवाय पर्याय उरत नाही. त्याचबरोबर ज्या उभयंतामध्ये कसलाही दोष नाही, त्यांना पुत्र प्राप्तीपासून कोणी रोखूही शकत नाही. अर्थात, मूल प्राप्ती ही दैववादी बाब नसल्याने नवस करण्याची गरज नाही. अंधश्रध्दा हा आपल्या सुखी जीवनाला कात्रण लावणारा भाग आहे. त्यामुळे आपल्यातील कुवतीची खरी ओळख होण्यासाठी आपण अंधश्रध्देतून बाहेर पडायला हवे. सूनेला मूल होत नाही म्हणून तिचा छळ करणे किंवा तिची मानहानी करणे म्हणजे मूर्खपणा होय. कदाचित आपल्या मुलामध्येही दोष असू शकतो. म्हणून उभयतांना देव-देवतांसमारे उभे करून नवस बोलण्यापेक्षा वैद्याकडे नेऊन औषधोपचार करणे योग्य असते. विज्ञान युगाने आज खूप प्रगती केली आहे. मूल प्राप्तीसाठी खूप प्रगत मार्ग अवलंबिले जात आहेत. त्यामुळे अंधश्रध्देतून बाहेर पडून आजच्या विज्ञानयुगातील प्रगतीचा मार्ग अवलंबून आपण सुखी समाधानी, आनंदी व्हायला हवे. संतांना अंधश्रध्दा मान्य नाही, त्यामुळे संतांच्य, अध्यात्माच्या नांवावर चुकीचे काही खपवायचा प्रयत्न करीत जाऊ नये. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. २२ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- आद्रा (२२.१३)
योग - सुकर्मा (३०.०७)
करण - कौलव (१२०१)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते १.३०

दिनविशेष :
श्री नृसिंह नवरात्रारंभ.
१६२१: शिखांचे नववे गुरू 'गुरू तेग बहादूर' यांचा जन्म झाला.
१८८९: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक 'डॉ. केशव बळीराम हेडगेवार' यांचा जन्म झाला.
१९३३: रोल्स-रॉयस लिमिटेडचे सहसंस्थापक 'हेत्री रॉयस' यांचे निधन झाले.

# सुनेचा गर्भपात केल्याप्रकरणी सासू व सासरे यांना अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

फिर्यादीचा गोळ्या देऊन गर्भपात केलेप्रकरणीच्या गुन्ह्यात मामे सासू व सासरे अल्ताफ कुमठे, तसमिम कुमठे, शहानवाज शेख रा. सोलापूर यांना सोलापूर येथील सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.



फिर्यादीस लग्नानंतर शारीरिक व मानसिक त्रास दिला, नोकरीसाठी १० लाख रुपये मागितले आणि गोळ्या देऊन जबरदस्तीने गर्भपात केले प्रकरणीफिर्यादीच्या सासरकडील लोकांनविरोधात विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे आरोपींच्या अटकेची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे आरोपी अल्ताफ कुमठे, तसमिम कुमठे आणि शहानवज शेख यांनी ॲड. देवदत्त बोरगावकर यांच्यामार्फत सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनाचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जास सरकारी वकिलांनी तीव्र विरोध केला होता. तसेच फिर्यादीने देखील जामीन अर्जला विरोध करणारे प्रतिन्यापत्र दाखल केले होते . त्यावर आरोपीचे वकिलांनी युक्तीवाद करताना असा मुद्दा मांडला की, फिर्यादीच्या गर्भपाताशी आरोपी हे मामे सासू व सासरे आहेत त्यांचा प्रकारणांशी कोणताही संबंध नाही, आरोपी हे त्या ठिकाणी राहणेस सुद्धा नाही, त्यामुळे कधी त्रास देण्याचा प्रश्नच नाही असा युक्तिवाद केला. तसेच युक्तिवादच्या अनुषंगाने काही महत्वाची कागदपत्रे दाखल केली. सदरची सर्व परिस्थिती, कागदपत्रांचा विचार करून न्यायालयाने शिक्षक मामे सासू व सासरे यांचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर कामी आरोपीतर्फे ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड. निकिता कुलकर्णी ॲड. शिवानी करवा तर सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार व मूळ फिर्यादीतर्फे ॲड. इनामदार यांनी काम पाहिले.

# जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्यांची 'एंट्री' निश्चित





### विशेष सभेत ठरणार सात जागांचे भवितव्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला असून, यासाठी आवश्यक असलेले राजपत्र १५ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावून स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया राबविणार आहेत. या सभेत नामनिर्देशन स्वीकारले जाणार असून, गटनोंदणीची मुदत ९ मेपर्यंत देण्यात आली आहे.

राजपत्र प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामविकास विभागाकडून स्वतंत्र शासन निर्णय काढला जाणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील स्वीकृत सदस्य नियुक्तीची प्रक्रिया वेगाने सुरू होणार आहे. प्रशासन, सामाजिक कार्य किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचा अनुभव असलेल्या व्यक्तींना या माध्यमातून संधी दिली जाणार आहे.

नियमांनुसार, निवडून आलेल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या दहा टक्के किंवा किमान पाच सदस्यांना स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त केले जाऊ शकते. संबंधित पक्ष व गटांचे संख्याबळ लक्षात घेऊन जागांचे वाटप होणार असल्याने गटनेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. स्वीकृत सदस्यांना जिल्हा परिषद किंवा विषय समित्यांच्या बैठकीत मतदानाचा अधिकार राहणार नाही. तसेच अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सभापतीपदासाठी त्यांना संधी मिळणार नाही. निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर स्वीकृत सदस्यांचाही कार्यकाळ संपुष्टात येईल.

### सोलापुरात सात जागांवर लक्ष


सध्याच्या राजकीय संख्याबळानुसार सोलापूर जिल्हा परिषदेत सात स्वीकृत सदस्यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. त्यात भाजपला चार जागा, तर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आघाड्यांना प्रत्येकी एक जागा मिळू शकते, अशी चर्चा आहे.

### राजकीय हालचालींना वेग

या निर्णयामुळे जिल्हा परिषद राजकारणात नव्या हालचालींना सुरुवात झाली आहे. इच्छुक उमेदवारांकडून लॉबिंग सुरू झाले असून, पक्षांतर्गत चर्चांनाही वेग आला आहे. आगामी काही दिवसांत स्वीकृत सदस्य निवडीवरून स्थानिक राजकारण अधिक रंगण्याची चिन्हे आहेत.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### गंधोदक हे केवळ जल नसून सकारात्मक ऊर्जेचा स्रोत



निर्मलं निर्मले करणं, पवित्रं पापनाशनम! जिन गंधोदकम वंदे, अष्ट क र्म विनाशनाम!! या मंत्राप्रमाणे गंधोदक हे केवळ सुगंधी जल नसून ते आत्म्याला निर्मळ करणारे आणि अष्टकर्मांचा क्षय करणारे पवित्र जल आहे, असे प्रतिपादन निर्यापक मुनी श्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी केले. सोलापूर येथील डब्ल्यू. आय. टी. दिगंबर जैन मंदिर येथे आयोजित ग्रीष्मकालीन वाचन कार्यक्रमांतर्गत प्रवचन देताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी गंधोदकाचे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व भाविकांना पटवून दिले. मुनीश्री म्हणाले की, जल स्वतः निर्मळ असते, परंतु जेव्हा ते तीर्थंकर भगवंतांच्या मूर्तीला स्पर्श करून 'गंधोदक' म्हणून प्राप्त होते, तेव्हा त्यामध्ये विशेष सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. हे जल मन, वचन, काय आणि पाच इंद्रियांमध्ये प्राण फुंकण्याचे कार्य करते. पाणी ज्या गोष्टीत मिसळते तिचा स्वभाव धारण करते. मंदिरातील मूर्तीमधून मिळणारी ऊर्जा गंधोदकात सामावलेली असते, जी मस्तकी लावल्याने सर्वांचे कल्याण होते. राणी मैना सुंदरीने सिद्धचक्र विधानाच्या गंधोदकाद्वारे राजा श्रीपाल यांचा कुष्ठरोग दूर केला होता, हा इतिहास गंधोदकाच्या अफाट शक्तीचा पुरावा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रवचनात मुनीश्रींनी स्पष्ट केले की, शांतीधारेमधील मंत्रोच्चारामुळे क्रूरता आणि पापांचा नाश होऊन करुणा वाढते. गंधोदकाद्वारे केवळ शरीरच नव्हे, तर भूमी, वास्तू आणि मंडपाचीही शुद्धी होते. शांतिमंत्रातील 'छिंद-छिंद' शब्दाचा प्रयोग रोगराई आणि संकटे दूर करण्यासाठी केला जातो. उपदेशाच्या शेवटी मुनीश्रींनी वर्तणुकीवर भाष्य करताना सांगितले की, जर कोणाला बदलायचे असेल, तर आधी स्वतःला बदला. महापुरुष आपल्या शब्दांपेक्षा आचरणातून शिष्यांना घडवत असतात. माणसाने बाह्य परिग्रहाचा त्याग करून अंतर्बाह्य शुद्ध होणे आवश्यक आहे.

# गायक मोहम्मद अयाज यांना 'महाराष्ट्र सन्मान'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

नुकतेच महाराष्ट्राचे महागायक विजेते तथा सोलापूर सूरमणी मोहम्मद अयाज यांना महाराष्ट्र सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आला. प्रतिष्ठित समजला जाणारा हा महाराष्ट्र सन्मान पद्मश्री डॉ. सोमा घोष यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळेस पद्मश्री डॉ. अशोक गुप्ता, राजेश श्रीवास्तव उपस्थित होते.

या कार्यक्रमात निरनिराळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या कलावंतांचा सन्मान करण्यात आला. मोहम्मद अयाज यांच्या कार्याची दखल घेऊन हा महाराष्ट्र सन्मान देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार सोहळा १८ एप्रिल रोजी मुंबई येथील मयूर ऑडोटोरियम येथे पार पडला.

# भारतीय स्टेट बँक परिवारातर्फे भीम अनुयायांसाठी मोफत जलसेवा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सोलापूर शहरात निघालेल्या भव्य मिरवणुकीतील भीम अनुयायांच्या सेवेसाठी भारतीस स्टेट बँक परिवारासह बँकेच्या विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पाणी वाटप कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या सेवा उपक्रमाचे उद्घाटन सोलापूर प्रादेशिक कार्यालयाचे प्रादेशिक व्यवस्थापक आनंदकुमार पाटकर यांच्या हस्ते लोकमंगल बिल्डिंग येथील म्युच्युअल फंड कार्यालयासमोर पार पडले.

अध्यक्ष राकेश कांबळे, सरचिटणीस गणेश वाघमारे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास नरेंद्र खंदारे, लोकेश लालबेगे, नरेंद्र बोगा, हारूण




सय्यद, सिद्धप्पा बिदवे, धनंजय होनमाने, अविनाश गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रशांत निकंबे यांनी केले तर आभार संदीप झोडगे यांनी मानले.

# श्री आद्य शंकराचार्य जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

वैशाख शुद्ध पंचमीनिमित्त श्री आद्य शंकराचार्य जयंती निमित्त पूर्व विभाग श्रीराम मंदिर, दाजी पेठ येथे भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात आद्य शंकराचार्यांनी रचलेल्या श्री गणेश पंचरत्न स्तोत्र, कल्याणवृष्टिस्तव, शिव पंचाक्षर नक्षत्रमाला स्तोत्र, लक्ष्मी नृसिंह करुणारस स्तोत्र तसेच श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्र यांच्या सामूहिक पठणाने झाली. याप्रसंगी सोलापूर शहर संघचालक राजेंद्र काटवे यांच्या हस्ते आदि शंकराचार्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मंदिराचे विश्वस्त व उद्योजक गोवर्धन चाटला यांनी प्रास्ताविक केले.

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या या सिद्धांताचे प्रातिभासिक, व्यावहारिक व पारमार्थिक सत्य या तीन स्तरांद्वारे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देत त्यांनी शंकराचार्यांनी दिलेली जीवनदृष्टी अधोरेखित केली. तसेच शंकराचार्यांनी स्थापलेल्या षण्मत परंपरेद्वारे विविध उपासना मार्गांमध्ये एकत्वाचा संदेश दिला असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी कांची येथील कांची कामकोटी पीठ परंपरेचे महत्त्व सांगत, पीठाचे ७०वे पीठाधिपती श्री शंकर विजयेन्द्र सरस्वती यांच्या मार्गदर्शनानुसार मंदिरात श्री राम भुजंगप्रयात स्तोत्र फलक स्थापनेचा उपक्रम राबविण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली. मंदिराचे नूतन अध्यक्ष व उद्योजक श्रीनिवास सामलेटी यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रमुख पाहुणे राजेंद्र काटवे यांनी आपल्या मनोगतातून भजन, कीर्तन, स्तोत्रपठण यांचे महत्त्व सांगून जीवनात चांगले संस्कार अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीनिवास सामलेटी यांनी आभार मानले. लहान मुलांनीही स्तोत्र पठणात उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी मंदिराचे विश्वस्त भूपती सामलेटी, दयानंद कोंडाबत्तीन तसेच उपाध्यक्ष दत्ता श्रीराम, सचिव शिवा कोंडाबत्तीन, श्रीहरी म्याकल, व्यंकटेश चिलका, योगेश म्याकल, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, विवेक दासरी, शिवकुमार मेरगू, महेश कोडम, राजीव आडम, दयानंद कारमपुरी, तिप्पन्ना मुदगुंडी, लक्ष्मी चाटला, मासाई चाटला उपस्थित होते.

# झेडपी पदाधिकाऱ्यांना नव्या कोऱ्या इनोव्हा, स्कॉर्पिओ अन् बोलेरो

### १२ नवीने वाहने येणार झेडपीच्या ताफ्यात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांसह विषय समिती सभापती व पंचायत समिती सभापदीसाठी नवी वाहने घेण्यात येणार आहेत. अध्यक्ष व उपाध्यक्षांसाठी यापूर्वी एसयुव्ही ७०० ही वाहने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु यात आता बदल करीत अध्यक्ष व उपाध्यक्षांना एसयुव्ही ७०० ऐवजी इनोव्हा घेण्याच्या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षांसह सभापतींची वाहने जुनी झाल्याने त्यांच्यासाठी नवीन वाहने खरेदी करण्यात येणार आहेत, त्यासाठी यापूर्वीच म्हणजेच प्रशासक काळातच पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या आजपर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तब्बल चार वर्षांनंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच शिक्षण व आरोग्य, समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि कृषी व पशुसंवर्धन समिती सभापतींच्या निवडी नुकत्याच पार पडल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेत आता 'नवा गडी नवा राज' ला सुरुवात झाली आहे.

यापूर्वीची वाहने जुनी झाल्याने तसेच ती मर्यादेपेक्षा अधिक काळ वापर केल्याने १२ नवीन वाहने झेडपीच्या ताफ्यात येणार आहेत. अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्यासाठी इनोव्हा अशी दोन वाहने, शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार, समाज कल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, महिला व बालकल्याण समिती सभापती ॲड. अमृता वाघे आणि कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांच्यासाठी चार स्कॉर्पिओ आणि सहा पंचायत समिती सभापतींसाठी सहा बोलेरो अशी एकूण १२ नवीने वाहने लवकरच खरेदी करण्यात येणार आहेत. याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# समाज घडविणे ही पूजा समजून शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करावे

### डॉ. विजयकुमार उबाळे यांचे प्रतिपादन

### आदर्श शिक्षक, कर्मचारी व उपक्रमशील शाळा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

शिक्षकांनी ज्ञानी, विवेकी व विनम्र बनावे.शिक्षक आणि शिक्षकेतर असा भेदभाव न करता सर्वांनी मिळून काम केले की संस्थेला यश मिळतेच. समाज घडविणे हीच पूजा समजून शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करावे 'असे प्रतिपादन माजी प्राचार्य तथा दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे यांनी केले.



येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्यावतीने बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणारे आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व उपक्रमशील शाळा पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. सहस्त्रार्जून शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष राजू भूमकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या समारंभास सो.स. क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री, आसावा प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनीषा पाटील, नगरसेवक रुद्रेश बोरामणी, डॉ. मल्लिकार्जुन तरनळी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.यावेळी व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, उत्सव समिती अध्यक्ष लक्ष्मीकांत बिराजदार, कार्याध्यक्ष अनिल वजीरकर उपस्थित होते.

याप्रसंगी गुरुनाथ वांगीकर, सोमेश्वर याबाजी, विजयालक्ष्मी बिराजदार, रामदास खवेकर, शितल महिमाने, कावेरी द्यावरकोंडा, मधुमती खंडेराव-लालबोंद्रे, वैशाली कदम, सूर्यकांत हत्तुरे-डोगे, प्रकाश राचेटी, शुभांगी कलकेरी, रियाज नदाफ, मनीषा कोकाटे, राजअहमद बाबूलाल शेख, डॉ. अंजली शिरसी या शिक्षकांची आदर्श शिक्षक म्हणून तर महारुद्र कत्ते, गणेश कविटकर, डॉ. शिवाजी शिंदे, मल्लिकार्जुन तालिकोटी यांचा आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. उपक्रमशील शाळा म्हणून ज्ञानज्योती मराठी विद्यालय- जुळे सोलापूर, सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिर, हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व समाधान माध्यमिक प्रशाला दहिटणे या चार शाळांचाही सन्मान करण्यात आला. प्रारंभी अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. शशिकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन दत्तात्रय खंडेराव यांनी केले तर उपस्थितांचे आभार गिरीश मंदरुपकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मल्लेश पुरवंत, शैलजा पुरवंत, सुनील शरणार्थी, कैलास जेऊरे, तम्मा कडगंची, सुनील रामशेट्टी यांनी परिश्रम घेतले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### 'आपुलकी'तर्फे गुणवंतांचा सन्मान

**सांगोला, दि. २१ एप्रिल-**

आपुलकी मित्र मंडळ, कडलास (ता.सांगोला) या संस्थेतर्फे हर्षद गायकवाड, स्वाती गायकवाड, सौरभ स्वामी या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल तसेच शाहीर सुभाष गोरे यांना नालंदा विद्यापीठाची लोक कलेमध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल जि. प. सदस्या शोभा खटकाळे व योगेश खटकाळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. मनोगतात योगेश खटकाळे यांनी संस्थेमार्फत कडलास गावात एक सार्वजनिक ग्रंथालय उभा करा त्यासाठी लागणारा सर्व निधी मी उपलब्ध करून देईन असे आश्वासन दिले. मुख्याध्यापक निंबाळकर यांनी आपुलकी संस्थेने जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दिल्याने त्यांना प्रोत्साहन मिळाले असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे उपाध्यक्ष विश्वनाथ शिंदे, शहाजी पाटील यांनी केले.



### दत्तकला ग्रुप ऑफ स्कूलमध्ये उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**जेऊर, दि. २१ एप्रिल-**

स्वामी चिंचोली व केतूर (ता. करमाळा) येथील दत्तकला ग्रुप ऑफ स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी संस्थेच्या सचिव माया झोळ, मुख्य प्रशसकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर, स्कूल डायरेक्टर नंदा ताटे, सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या वृषाली बागुल, डडउ स्कूलच्या प्राचार्या सिंधू यादव, केतूर शाळेचे प्राचार्य मरकड, संगीता खाडे उपस्थित होते. याप्रसंगी सचिव माया झोळ यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत ईीरळप त्र्यू, स्वसंरक्षण आणि अध्यात्म या विषयांचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या केवळ बुद्धीचा नव्हे, तर मन आणि व्यक्तिमत्त्वाचाही विकास घडतो. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या बुद्धीच्या सर्वांगीण विकासाबरोबरच मैदानी खेळ, लाठी-काठी, तलवारबाजी, कराटे, मल्लखांब तसेच स्वसंरक्षणाचे प्रभावी धडे देण्यात आले. शिबिराचे नियोजन डॉ. संतोष मचाले यांनी केले.



### दहिटणे गावात म. बसवेश्वर जयंती साजरी

**वैराग, दि. २१ एप्रिल-**

तालुक्यातील दहिटणे येथे एकता महिला मंचच्या वतीने युगपुरुष महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे, दहिटणे सारख्या छोट्या गावात महिलांच्या पुढाकाराने म हात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी होण्याची ही पहिलीच वेळ असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या 'कायकावे कैलास' (कष्ट हाच स्वर्ग) या विचारांचे स्मरण करण्यात आले. यावेळी लक्ष्मी सुतार, सुरेखा कोळी, आरती कोळी, वनिता जगताप यांच्यासह गावातील इतर महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला.




### सोगाव पूर्व शाळेत विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**करमाळा, दि. २१ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोगाव पूर्व येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी एक दिवसाच्या शिक्षिका बनून संपूर्ण दिवस शाळा चालवत आपल्या लाडक्या शाळेला आगळावेगळा निरोप दिला. मुख्याध्यापक सतीश कांबळे, शिक्षिका अनुराधा शिंदे यांच्या नियोजनाखाली निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या समारंभाच्या निमित्ताने प्रिया घनवट, आराध्या मल्लाव, कोमल भोई, काजल सरडे, शीतल भोई, गौरी मल्लाव, विहान सरडे या विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकाची भूमिका पार पाडली. त्यांनी पहिली ते सातवीच्या वर्गावर जाऊन प्रत्यक्ष अध्यापन केले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब सरडे व गावचे उपसरपंच विठ्ठल गोडगे यांनी उपस्थित राहून सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

### स्वातंत्र्य, समता व बंधुता तत्त्वांचे स्मरण करण्याची आवश्यकता : रूपनुरे

**सोलापूर. दि. २१ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण देशभर त्यांची जंयती साजरी करताना प्रामुख्याने लोकशाही टिकवण्यासाठी स्वातंत्र्य समता बंधुता या तिन्ही तत्त्वांचे वारंवार स्मरण करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक धोंडप्पा रुपनुरे यांनी केले. सुलेरजवळगे जि.प. मराठी शाळेत भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेच्या पूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी वसंत भिसे ब्रम्हदेव राठोड दानिस्ता सय्यद प्रेमलता देशमुख विद्यार्थी विद्यार्थिनी पालक व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पाझर तलाव रूपांतर कामात अनियमितता

## ▸▸शेतकऱ्यांचा तीव्र संताप

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २१ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील कारी गाव परिसरात जलसंपदा विभागाच्या वतीने सुरू असलेल्या देसाईवाडी (खरसडे) पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर करण्याच्या कामात सुरुवातीपासूनच गंभीर अनियमितता होत असल्याचे समोर आले आहे. हद्द निश्चितीशिवाय सुरू झालेले काम आणि निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर यामुळे बाधित शेतकऱ्यांम ध्ये संतापाची लाट असून, त्यांनी आता मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.



सदर प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी तलावाच्या हद्दीतील बाधित शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आणि त्यांच्या जमिनीची अचूक हद्द निश्चिती (Boundary Marking) करणे कायदेशीररीत्या आवश्यक होते. मात्र, जलसंपदा विभाग आणि संबंधित ठेकेदाराने या नियमाला पूर्णपणे बगल दिली आहे. कोणतीही अधिकृत मोजणी किंवा हद्द निश्चिती न करता थेट यंत्रसामग्री उतरवून कामाला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या खासगी जमिनीवर अतिक्रमण होण्याची आणि भविष्यात मोठा वाद निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

तलावाच्या कामात वापरल्या जाणाऱ्या साहित्याबाबत प्रत्यक्ष पाहणीत धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. तलावाच्या भरावासाठी वापरली जाणारी माती अत्यंत निकृष्ट असून, त्यात मोठ्या प्रमाणात दगड आणि चुनखडीचे अंश आहेत. वापरल्या जाणाऱ्या मातीची कोणतीही प्रयोगशाळा चाचणी (Lab Test) केलेली नाही. ठेकेदाराकडे माती परीक्षणाचा कोणताही अधिकृत अहवाल उपलब्ध नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. मंजूर अंदाजपत्रकानुसार आवश्यक असलेला मुरूम आणि दर्जेदार मातीचा वापर टाळून केवळ 'मर्जी' प्रमाणे काम रेटले जात असल्याचे चित्र आहे. या कामाची तात्काळ उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी व्हावी. जोपर्यंत जमिनीची अधिकृत हद्द निश्चित होत नाही आणि मातीचा दर्जा तपासला जात नाही, तोपर्यंत काम थांबवण्यात यावे. दोषी अधिकारी आणि मनमानी करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी.

**गावच्या सुरक्षेला धोका; जीवितहानीची शक्यता**

शेतकऱ्यांनी पत्राद्वारे प्रशासनाचे लक्ष एका गंभीर बाबीकडे वेधले आहे. जर तलावाचे काम अशाच निकृष्ट दर्जाचे राहिले, तर पावसाळ्यात हा साठवण तलाव फुटण्याची दाट शक्यता आहे. कारी गाव तलावाच्या जवळ असल्याने, तलाव फुटल्यास केवळ शेतीचेच नव्हे, तर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याचा धोका आहे. प्रशासनाची ही निष्क्रियता भविष्यात मोठ्या आपत्तीला आमंत्रण देऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

**वरिष्ठ पातळीवर तक्रारींचा पाऊस**

या सर्व प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत, बाधित शेतकऱ्यांनी थेट राज्याच्या सत्तेच्या चाव्या असलेल्या नेत्यांकडे दाद मागितली आहे. त्यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री, स्थानिक खासदार व आमदार जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवून कारवाईची मागणी केली आहे.

**प्रशासकीय प्रतिसादाकडे लक्ष**

आता या गंभीर तक्रारीनंतर जिल्हा प्रशासन आणि जलसंपदा विभाग या ठेकेदारावर काय कारवाई करणार आणि शेतकऱ्यांना न्याय देणार का, याकडे संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# विषय समितीच्या निवडणुकीत पक्षनेत्यांच्या शब्दाला मान दिला

### ●झेडपीचे माजी पक्षनेते आनंद तानवडे यांनी मांडली भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या विषय समितीच्या सदस्यांची निवड नुकतीच पार पडली. त्यावेळी अक्कलकोट तालुक्यातील शिवसेनेचे सदस्य प्रवीण तानवडे व शिवराज म्हेत्रे यांनी उम दवारी दाखल केल्यामुळे भाजपची कोंडी झाली होती. शिंदेसेनेच्या सदस्यांना भाजपने संधी दिली होती. परंतु आमचा आग्रह स्थायी व समाज कल्याण समितीसाठी होता असे आनंद तानवडे यांनी स्पष्ट केले.



माझ्याशी पक्षनेत्या रश्मी बागल यांनी संपर्क केला. अक्कलकोटचे भाग्यविधाते माजी आमदार कै. बाबासाहेब तानवडे व करमाळ्याचे माजी आमदार कै दिगंबर बागल यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे बागल यांच्या कन्या व जिल्हा परिषदेच्या पक्षनेत्या म्हणून रश्मी बागल यांच्या शब्दाला आम्ही मान दिला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचीही भूमिका पॉझिटिव्ह होती. इथे निधीचा कोणताही प्रश्न आलेला नाही. त्यांचे किंगमेकर म्हणून विनाकारण महत्व वाढवले. शिवसेनेचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अक्कलकोट तालुक्यावर विशेष लक्ष आहे. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाला बळ दिले जात आहे. अक्कलकोट तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढवली जाणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेतत आमची भूमिका ठाम राहणार आहे असे तानवडे यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषदेत सध्या विरोधी पक्षनेते पद खालसा केल्याचे दिसत आहे. तसे पाहिले तर पक्षनेता हे पद ही जिल्हा परिषदेच्या घटनेत नाही. सत्ताधाऱ्यांनी कारभार करण्यासाठी कोणतीही भूमिका घेतली असली तरी शिंदे शिवसेना आपली ताकद दाखविणाराच, अशी भूमिका तानवडे यांनी मांडली.

**जिल्हा परिषदेतही आवाज घुमविला जाईल**

महापालिकेत अमोल शिंदे ज्याप्रमाणे शिंदे शिवसेनेचा आवाज घुमवित आहेत त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेतही आवाज घुमविला जाईल, अशी भूमिका झेडपीचे माजी पक्षनेते आनंद तानवडे यांनी सोमवारी मांडली.



# लोकविकास स्कूलच्या विद्यार्थ्यांचे टॅलेंट सर्च परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २१ एप्रिल-**

वेळापूर येथील लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी डायमंड टॅलेंट सर्च एक्झामिनेशनमध्ये यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक परंपरेला उजाळा दिला आहे.

ऋग्वेद हेल्थ बारामती फाउंडेशन संचलित ही परीक्षा शाळेत घेण्यात आली होती. या परीक्षेत समृद्धी राहुल बनकर हिने विभागातून प्रथम क्रमांक पटकावला, तर शिवन्या सचिन बनकर हिने तृतीय क्रमांक मिळवला. नित्यश्री नवनाथ बनकर हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

तसेच त्रिशा माने-देशमुख, स्वरा विकास माने, आर्या सचिन फरतडे, ओम अविनाश पिसे आणि शिवम नितीन पिसे या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले. मुख्याध्यापक अजित बनकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक अमोल पांढरे, सुनील पताळे, अजित बनकर, अश्विनी शिंदे, राणी शिंदे, प्रियंका अनंतकवळस, उषा राऊत, पूजा कुदळे, कोमल चव्हाण, वैशाली पांढरे, ज्योती गाडेकर आणि वैभव जगताप यांनी अभिनंदन केले.



# यल्लमा हॅण्डलूममध्ये उन्हाळी ऑफर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

कॉटन साड्या, व ड्रेस मटेरियलसाठी प्रसिद्ध असलेल्या भद्रावती पेठ व दत्त चौक येथील यल्लमा हॅण्डलूममध्ये खास उन्हाळा निमित्त कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलच्या खरेदीवर २० टक्के दिले जात असलेले यल्लमा हँडलूमचे व्यवस्थापक यल्लाप्पा नादर्गी यांनी सांगितले.

नाविन्यपूर्ण व भरपूर व्हरायटी असलेल्या यल्लमा हॅण्डलुममध्ये कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे फ्रेश स्टॉक व कॉम्बो ऑफर व उन्हाळा स्पेशल ऑफर दिली जात आहे यामध्ये मिक्स कॉटन साडी ३ नग ६९९/- रुपये व प्युअर कॉटन साडी ३ नग ९९९/- मध्ये विविध राज्यातील कॉटन साड्या ड्रेस मटेरियल असून यामध्ये असंख्य व्हरायटी उपलब्ध आहेत.

जसे ओरिसा कॉटन मदुराई कॉटन कर्नाटक कॉटन व्यंकटगिरी कॉटन कलकत्ता कॉटन अजरक प्रिंट राजस्थानी बगरू प्रिंट कलम कारी प्रिंट पोचमपल्ली कॉटन जाम दानी कॉटन इचलकरंजी कॉटन (सनफ्लॉवर साडी) केरळा कॉटन असे विविध राज्यातील हँडलूम व पॉवरलूम कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलच्या असंख्य वरायटीज उपलब्ध आहेत

### रंगभरण स्पर्धेचे आज बक्षिस वितरण

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेच्यावतीने शिवजयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धेचे आज बक्षिस वितरण होणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष विनोद आगलावे यांनी दिली. हा कार्यक्रम प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज माने,चित्रकार नितीन खिलारे, सुनिल चव्हाण, संजीव चाफाकरंडे, उल्हास बिराजदार, सोमेश्वर याबाजी, सचिन चौधरी, अ.गफुर अरब व वल्लभ चौगुले हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

समाजकल्याण केंद्र, रंगभवन येथे दुपारी ४.३० वाजता हा कार्यक्रम पार पडणार आहे.शिवजयंतीनिमित्त चार गटात ही स्पर्धा पार पडली होती.९ हजार विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.



# बेगम पेठ येथे महापालिकेची अतिक्रमणावर धडक कारवाई

### ●अतिक्रमित सिमेंटचे गोडाऊन जेसीबीने काढले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने शहरातील बेगम पेठ पोलीस चौकी शेजारी रस्त्याला अडथळा ठरणारे लोणावत यांचे पत्रा शेडमध्ये असलेले सिमेंटचे गोडाऊन जेसीबी द्वारे निष्काशित करण्यात आले. महापालिका नगर रचना विभाग आणि अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने ही संयुक्त कारवाई केली.

महापालिका नगर रचना कार्यालयाकडून अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांना कारवाई करण्यासंदर्भात पत्रान्वये सूचित करण्यात आले होते. त्यानुसार आज महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने कारवाई हाती घेतली. शहरातील बेगम पेठ पोलीस चौकी शेजारी रस्त्याला अडथळा ठरणारे लोणावत यांचे पत्रा शेडमध्ये असलेले सिमेंटचे गोडाऊन जेसीबी द्वारे निष्काशित करण्यात आले. दरम्यान, परिसरात नागरिकांची गर्दी जमली होती. उन्हाच्या कडाक्यात अधिकारी, कर्मचारी यांनी पोलीस बंदोबस्तात ही कारवाई केली. त्यानंतर मधला मारुती परिसरातही मोहीम राबवण्यात आली.

विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करू नये. रस्त्याला अडथळा आल्याचे दिसून आल्यास तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास जप्ती आणि इतर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

# बसवेश्वर जयंती : कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

सोलापूर जगद् ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून 'श्री महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान' जुळे सोलापूर यांच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'नारीशक्ती' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यात सरोजिनी टिपे, मीनल दास, डॉ. वैशाली मैदर्गी, शिक्षिका रूपाली येळमेली, माजी सभापती विद्या शिंदे, प्रांजली मोहेकर, कल्पना भोसले, आरती कुशेकर आणि अरुंधती हराळकर या महिलांना त्यांच्या कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते 'नारीशक्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आणि मंजुषा दोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना मान्यवरांनी महात्मा



बसवेश्वरांच्या विचारांची सुसंगतता सांगत, महिलांच्या कार्याचे कौतुक केले.

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम, सुरेखा पडसलगी, एड. केदार पाटील, जगदेव सुरवसे, चंद्रकांत कुलकर्णी, संभाजी भोसले, उत्सव अध्यक्ष महेश इचगे, उपाध्यक्ष राहुल उपासे, सचिव शिवराय आलूरे, कोषाध्यक्ष लिंगराज ख्याड, कार्याध्यक्ष सिद्धाराम येणेगुरे, परमेश्वर माळगे, सचिन कोटाणे, धर्मराज नाशी, अजिंक्य उपीन यांच्यासह प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उत्तम फाउंडेशनतर्फे खासदार वाघमारे, म्हेत्रे यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड (अध्यक्ष, उत्तम सोशल फाउंडेशन) यांची खासदार डॉ. ज्योती वाघमारे व सिद्धाराम म्हेत्रे (माजी गृहराज्यमंत्री) यांच्यासोबत सदिच्छा भेट झाली. यावेळी उत्तम सोशल फाउंडेशनच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच सामाजिक कार्य आणि समाजउन्नती विषयांवर चर्चा करण्यात आली.

खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी उत्तम सोशल फाउंडेशनने आता पर्यंत केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अखंड महाराष्ट्र रेल्वे परिषदेचे रविवारी आयोजन

**सांगोला, दि. २१ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रवासी, विचार मंच, सर्व कृती समिती, सामाजिक संघटनेच्यावतीने पहिल्या महाराष्ट्र रेल्वे परिषदेचे आयोजन रविवार दि.२६ एप्रिल रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रालय नायगाव दादर (पूर्व) येथे स.१० वा. आयोजित करण्यात आल्याची माहिती सांगोल्यातील शहीद अशोक कामटे संघटनेचे अध्यक्ष निलकंठ शिंदे यांनी दिली. पंढरपूर हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असल्याने संपूर्ण देशभरातून भाविक-भक्त या ठिकाणी येत असतात.

त्यांना मुंबईतून दररोज रेल्वे सेवा सुरू व्हावी तसेच दिल्ली, वाराणसी, चंदिगड, चेन्नई, कोलकत्ता, विशाखापट्टणम या रेल्वे सेवा सुरू होणे आवश्यक आहे. मिरज-कुर्डूवाडी लोहमार्गाचे दुहेरीकरणही तितकेच तात्काळ होणे गरजेचे आहे. याकरता संघटनेचा पाठपुरावा सुरू आहे. वरील मागण्या करण्याकरता या परिषदेच्या माध्यमातून जनजागृती करून आवाज उठविणार आहे. तसेच सदर रेल्वे परिषदेत रेल्वे समस्यांचे सादरीकरण, प्रवासी संघटनांची मते सूचना, तज्ञांचे मार्गदर्शन, मागण्यांबाबत चर्चा, पुढील आंदोलनाची दिशा यावर चर्चासत्र होणार आहे. तरी इच्छुकांनी मो.नं.८९८३५४१५१५ या क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी असे आवाहन निलकंठ शिंदे यांनी केले आहे.



### महत्त्वाचे...



### अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते अमोल बोराळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २१ एप्रिल-**

एका शिक्षकाने आयुष्यभर दिलेली सेवा आणि त्यागाची पावती ही केवळ पुरस्कारात नसून, ग्रामस्थांच्या प्रेमात असते, याचा प्रत्यय नुकताच अक्कलकोट येथे आला. बावकरवाडी (ता. अक्कलकोट) येथून बदली झालेले शिक्षक अमोल गुरुनाथ बोराळे यांचा जुन्या शाळेतील शिक्षक आणि ग्रामस्थांच्या वतीने एका सोहळ्यात सन्मान करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला. यावेळी अक्कलकोटचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी, सरपंच वर्षा भंडारकवठे, युवा नेते अभिजित पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश बावकर, ज्योतिबा जाधव आणि कृषी अधिकारी प्रकाश जाधव उपस्थित होते.



### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बसवसृष्टी निर्माण करा

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

विजापूर रोड मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर महामंडळाच्यावतीने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत महात्मा बसवेश्वरांचे ५ एकर मध्ये बसव सृष्टी निर्माण करावे अशी मागणी प्राचार्य मनोज बिडकर यांच्याकडे माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या बसवसृष्टीमध्ये अश्वारूढ पुतळा, कायक शरणांची माहिती, विद्यार्थ्यांसाठी मोठे अद्यावत आधुनिक सभागृह उभारणी करावे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सुमारे २८ एकर जागा असून या संस्थेत २७ व्यवसाय प्रशिक्षण कोर्स चालतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, मंत्री मंगल प्रभात लोढा, पालकमंत्री जयकुमार गोरे व दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे ईमेलद्वारे माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी मागणी केली आहे. यावेळी विजापूर रोड मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर महामंडळाचे ट्रस्टी रमेश हसापुरे, सकलेश बाबुळगावकर, बसवराज दिंडोरे, नामदेव फुलारी, चनबसप्पा गुरुभट्टी उपस्थित होते.




### शिराळा येथे मोफत पशु आरोग्य तपासणी शिबीर

**जेऊर, दि. २१ एप्रिल-**

डोडला डेअरी लिमिटेड लोहारा कपिलापुरी दूध शीतकरण केंद्र अंतर्गत मोफत पशु आरोग्य तपासणी शिबिर शिराळा (ता.परंडा जि. धाराशिव) येथे आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पशु आरोग्य, दुग्ध उत्पादन, दुधाची गुणवत्ता सुधारणे यावर मार्गदर्शन करण्यात आले लक्ष्मण हजारे यांच्या दूध संकलन केंद्र शिराळा मधील सर्व शेतकऱ्यांच्या गाईंचे मोफत तपासणी व वासरांना जंतनाशक इत्यादी, प्रकारचे औषध उपचार करण्यात आला. आणि शेतकऱ्यांना मोफत मिनरल मिक्स्चर, लिव्हर टॉनिक, जंतनाशक देण्यात आले. यावेळी डोडला डेअरी लिमिटेड महाराष्ट्र हेड डॉ.जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले तसेच कंपनीचे डॉ. रणजीत खराडे, तृषाल हेडाऊ (झोनल मॅनेजर) युनिट हेड सुरज गोलतकर, सुपरवायझर समाधान घोडके व ज्ञानेश्वर धुमाळ यांच्या उपस्थितीत पार पडले.

### प्रिया क्षीरसागर-लोकरे यांना वनस्पती शास्त्र विषयात पीएचडी पदवी

**कुर्डुवाडी, दि. २१ एप्रिल-**



डॉ.सौ प्रिया श्रीपाद क्षीरसागर यांना वनस्पती शास्त्र विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर यांचेकडून वनस्पती शास्त्र विषयात संशोधन केल्याबद्दल पी.एच.डी.पदवी मिळाली आहे. त्यांना पीएचडी साठी झकारिया कॉलेज संभाजीनगर येथून मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या यशामुळे कुर्डुवाडी येथील नागरिकांमध्ये कौतुक होत आहे. डॉ. प्रिया क्षीरसागर या डॉ. वागळे हॉस्पिटल मधील माजी वरिष्ठ लेखनिक व कुर्डुवाडीतील ज्येष्ठ पुरोहित श्री शरदचंद्र क्षीरसागर यांच्या त्या सुनबाई आहेत.



# भीमा नदीचे पात्र कोरडेच

## पाणी सोडण्यासाठी होतेय राजकारण

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२१ एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्यात भीमा नदी कोरडी ठणठणीत पडली असून नदीच्या पात्रात चिमणीला पिण्याइतपतही पाणी उपलब्ध नसल्याने नदी काठावरील गावातील नागरिकांच्या घशाला पाण्याअभावी कोरड पडली आहे.

दरम्यान खा.प्रणिती शिंदे यांनी भीमेत पाणी सोडण्यासाठी अधिक्षक अभियंता यांना पत्र देवूनही पाणी सोडण्यासाठी टाळाटाळ होत असल्याने संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द नागरिक व शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुणे जिल्हयातून वाहणार्या भीमा नदीवर उजनी धरण बांधण्यात आले. या पाण्याचा पिण्यासाठी व शेतीसाठी उपयोग व्हावा या उदात्त हेतूने हे धरण उभे राहिले गेले. मात्र सध्या भीमा नदीत पाणी सोडण्यासाठी राजकारण सुरु असल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे. दि.१३ एप्रिल रोजी सोलापूरच्या खा. प्रणिती शिंदे यांनी अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांना लेखी पत्र देवून उजनी धरणातून पिण्याकरिता व शेतीकरिता भीमा नदीत पाणी सोडावे अशी विनंती केली आहे. परिणामी पाण्या अभावी मंगळवेढा, पंढरपूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट या नदीकाठावरील नागरिकांच्या घशाला कोरड पडल्याने पाण्यासाठी आक्रोश होत आहे.

नदीकाठावरील बागायत क्षेत्राला पाणी देण्यासाठी नदीत पाणी नसल्यामुळे उभी लाख मोलाची पिके करपून जात असल्याचे विदारक चित्र आहे. या पिकासाठी शेतकर्यांनी बँकांकडून पिककर्ज घेवून ही पिके जोपासली आहेत. पाणी सोडण्याच्या कारणासाठी श्रेय मिळविणेकामी राजकारण सुरु असल्याची खमंग चर्चा सर्वत्र सुरु आहे. राजकीय पुढार्यांनी पाण्यासाठी राजकारण न करता नदीत पाणी सोडून ऐन उन्हाळ्यात लोकांना जीवदान द्यावे अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे डिजिटल पाऊल

**● मोबाईल ॲपमुळे लाभार्थ्यांना थेट सेवा ●**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ एप्रिल -**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने डिजिटल दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत Annasaheb Patil Mahamandal app हे ॲप सुरू केले आहे. या ॲपमुळे लाभार्थ्यांना योजनांची संपूर्ण प्रक्रिया थेट मोबाईलवरून करता येणार असून सेवा अधिक सुलभ, जलद, पारदर्शक होणार आहे.

महामंडळाच्या विविध योजनांसाठी www.udyog.mahaswayam.gov.in हे संकेतस्थळ कार्यान्वित आहे. मात्र अर्ज प्रक्रियेसाठी संगणक किंवा सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत असल्याने लाभार्थ्यांना वेळ व खर्च करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर, ३ सप्टेंबर २०२५ रोजी नागरी सुविधा केंद्र व आपले सरकार केंद्रांशी करार करून प्रति सेवा ८५ रुपये दराने सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. आता पुढील टप्प्यात मोबाईल ॲपची सुविधा सुरू करण्यात आली आहे.

हे ॲप Play Store वर उपलब्ध असून, नवीन वापरकर्ते मोबाईल, नाव व मेलद्वारे OTP पडताळणी करून नोंदणी करू शकतात. पूर्वी नोंदणीकृत लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे थेट लॉगिन करून पुढील प्रक्रिया करता येणार आहे. महामंडळाच्या योजनांमध्ये LOI, Sanction आणि Claim असे तीन टप्पे असून आवश्यक कागदपत्रे ॲपद्वारे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

मोबाईल ॲपमध्ये संगणक प्रणालीवरील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर ॲप डाउनलोड करून या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे जिल्हा समन्वयक, सौरभ मगर यांनी पत्रकान्वये केले आहे.

## तांदुळवाडीत ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २१ एप्रिल-**

तांदुळवाडी (ता. माळशिरस) : येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे . हा धार्मिक सोहळा सोमवार दि. २० एप्रिल ते रविवार दि. २६ एप्रिल या कालावधीत तांदुळवाडी येथे पार पडणार आहे.

हा कार्यक्रम गुरुवर्य विवेकानंद वासकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व गुरुवर्य देवव्रत (राणू मालक) वासकर महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आला असून भाविकांसाठी हा आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. सप्ताह काळात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज पहाटे काकडआरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन, भजन, हरिपाठ, प्रवचन व कीर्तन असे कार्यक्रम होणार आहेत. तसेच सायंकाळी ९ ते १० या वेळेत भोजन व त्यानंतर हरिजागर आयोजित करण्यात येणार आहे. सप्ताहामध्ये विविध ठिकाणचे हरिभक्त, कीर्तनकार व प्रवचनकार सहभागी होणार असून देवव्रत (राणू मालक) वासकर महाराज प्रवचन सेवा देणार आहेत., तर ह.भ.प. नामदेव बुवा वासकर, ह.भ.प. केशव बुवा जाधव, ह.भ.प. यशवंत बुवा पाटील, ह.भ.प. विठ्ठल बुवा सूर्यवंशी, ह.भ.प. बाळू बुवा पाटील, ह.भ.प. विनायक बुवा बंडगर आदींची कीर्तन सेवा लाभणार आहे. रविवार दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. आनंद बुवा जाधव (करमाळा) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ, तांदुळवाडी (ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बार्शी तहसीलमध्ये आंदोलनाचे रणशिंग, काम बंदमुळे प्रशासकीय यंत्रणा ठप्प

**● जुनी पेन्शन आणि प्रलंबित मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांचा एल्गार**




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

आज मंगळवार दि. २१ एप्रिलपासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी बेमुदत संपात बार्शी तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी एकजुटीने सहभागी झाले आहेत. 'आता नाही तर कधीच नाही' असा पवित्रा घेत कर्मचाऱ्यांनी आज सकाळपासूनच तहसील कार्यालयासमोर ठिय्या मांडून कामकाज पूर्णपणे बंद ठेवले आहे.

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली. हातामध्ये मागण्यांचे फलक आणि सरकारच्या विरोधात संताप व्यक्त करत, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत माघार घेणार नसल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**प्रमुख मागण्या :** जुनी पेन्शन योजना: २००५ पूर्वीच्या नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करावी. रिक्त पदे भरणे- चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि इतर रिक्त जागांवर तात्काळ पदभरती करावी. सेवानिवृत्ती वय- कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात यावे. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न अनेक वर्षांपासून राबणाऱ्या कंत्राटी व रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात.

तहसील कार्यालयात विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना आज रिकाम्या हाती परतावे लागले. महसूल विभागाचे कामकाज पूर्णपणे थांबल्यामुळे दाखले, सातबारा उतारा आणि इतर प्रशासकीय सुनावण्या लांबणीवर पडल्या आहेत. आम्हाला नागरिकांच्या गैरसोयीबद्दल खेद आहे, पण आमच्या सुरक्षित भविष्यासाठी आणि हक्कासाठी ही लढाई अनिवार्य आहे, असे एका कर्मचाऱ्याने यावेळी सांगितले. या आंदोलनामध्ये बार्शी तहसील कार्यालयातील सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून, जोपर्यंत राज्यस्तरावरुन संपाबाबत पुढील निर्णय येत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरुच राहणार आहे.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून बेमुदत संप

**सोलापूर सिडस् पेस्टीसाईडस् ॲन्ड डिलर्स असोशिएशनचा इशारा...**

**जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन; शेतकऱ्यांना खते-बियाणे घेवून जाण्याचे केले आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील प्रलंबीत अडचणीसंबंधी राज्याच्या कृषी विभागाकडून कार्यवाही होत नसल्यामुळे कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा दि. २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत विक्री केंद्रे बंद ठेवण्याचा इशारा सोलापूर सिडस् पेस्टीसाईडस ॲन्ड डिलर्स असोशिएशनच्या वतीने इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, हा संप बेमुदत असल्याने जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी २७ एप्रिलपूर्वी खते, बियाणे घेवून जाण्याचे आवाहन संघटना पदाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या बियाणे, रासा. खते व किटकनाशक औषधे विक्री व्यवसायातील खालील अडीअडचणीवर न्याय कारवाई/निर्णय होणेसाठी विक्रेत्यांच्या माफदा संघटनेकडून राज्याचे कृषी मंत्री, राज्याचे प्रधान सचिव (कृषी), राज्याचे आयुक्त कृषी महाराष्ट्र व कृषी संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण पुणे यांचेकडे गेली ४-५ वर्षे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु, विक्रेत्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत ठोस कार्यवाही होत नाही. विक्रेत्यांच्या अडचणी दूर होणेसंबंधी तातडीने कार्यवाही होणेसाठी विक्रेत्यांच्या या मागण्याकडे




शासनाचे लक्ष केंद्रीत करणेसाठी, राज्यातील सर्व जिल्हयातील सर्व कृषी सेवा केंद्रे. दि. २७ एप्रिल २०२७ पासून बेमुदत कालावधीसाठी किंवा राज्याच्या कृषी विभागाकडून विक्रेत्यांच्या अडचणी दूर होणेबाबत ठोस व लेखी आदेश मिळेपर्यंत, राज्यातील जिल्हा संघटनांनी सर्वानुममे घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बंद आंदोलन सुरु करण्यांत येणार आहे. जिल्हयातील सर्व कृषी सेवा केंद्रे दि. २७/४/२०२६ पासून बेमुदत कालावधीसाठी बंद रहाणार असल्यामुळे याबाबत जिल्हा संघटनेकडून व तालुका संघटनेकडून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली आहे.

दि.२६/४/२०२६ अखेरपर्यंत आपले जिल्हयातील सर्व शेतकरी बांधवांनी त्यांना आवश्यक असलेल्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रातून खरेदी करणेबाबत सर्व कृषी केंद्राबाहेर दर्शनी भागामध्ये बोर्ड लावण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे. दि. २७/४/२०२६ पासून बेमुदत कालावधीसाठी कृषी सेवा केंद्र बंद आंदोलन सुरु होणार असल्याने बियाणे, रासा. खते व किटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी जिल्ह्यातील ठोक व किरकोळ विक्रेत्यांना पाठविणेच्या निविष्ठा, दि.२६/४/२०२६ पर्यंत उतरुन घेतला जाईल. २७ एप्रिल २०२६ पासून विक्री केंद्रे बंद आंदोलन संपेपर्यत, कोणत्याही जिल्हयातील एकही घाऊक अथवा किरकोळ विक्रेता चालक, कंपन्याकडून येणारे बियाणे, रासा. खते व किटकनाशके उतरुन घेणार नाहीत. असे सर्व कंपन्यांना लेखी पत्राव्दारे कळविण्यांत आलेले आहे. बंद आंदोलन संपेपर्यंतचे कालावधीत आपले जिल्हयातील सर्व कृषी सेवा केंद्रे माफदा संघटनेची बंद संबंधी अधिकृत सुचना जाहीर होईपर्यंत १०० टक्के बंद रहातील. विक्रेत्यांचे विक्री केंद्रे बंद आंदोलन, पुर्णपणे शांततेच्या मार्गाने करण्यांत येणार असून, कोणत्याही प्रकारे कायदा व सुवस्थेसंबंधी प्रश्न निर्माण होणार नाही.

विक्रेत्यांच्या बियाणे, रासा. खते व किटकनाशके यांच्या महत्वाच्या अडचणीसंबंधी तातडीने निर्णय होणेसाठी दि. २७ एप्रिलपासून बेमुदत कालावधीसाठी विक्री केंद्रे बंद बाबतचे विक्रेत्यांच्या माफदा राज्य संघटनेने, कृषी संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण कृषी आयुक्तालय पुणे यांना दि. १६ एप्रिलला निवेदन दिले आहे. या निवेदनावर संघटना अध्यक्ष गुंडप्पा पंचे, उपाध्यक्ष दयानंद झुरळे, सचिव बालाजी चौगुले, खजिनदार संजय कट्टे आदींच्या सह्या आहेत.



## महेश इंगळे, अमोल राजेभोसले यांचा जेऊर येथे सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२१ एप्रिल-**

निसर्गसंवर्धन ही महत्त्वाची बाब असून या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सहकार्य करून त्यांना प्रोत्साहन देणार असल्याचे प्रतिपादन श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थान, अक्कलकोट मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले.

यशकल्याणी नेचर कॉंझर्वेशन सोसायटी (करमाळा) यांच्या वतीने देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे व श्री स्वामी समर्थ महाराज अन्नछत्र मंडळ ट्रस्टचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांचा जेऊर (ता. करमाळा) येथे पक्षीमित्र कल्याणराव साळुंके यांच्या निवासस्थानी सन्मान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी साळुंके परिवारातर्फे पक्षी प्रतिमा भेट देऊन तसेच जोधपुरी फेटा बांधून दोघांचा गौरव करण्यात आला. पक्षीसंवर्धनासाठी कार्य करणाऱ्या यशकल्याणी नेचर कॉंझर्वेशन संस्थेस मदत करण्याची ग्वाहीही यावेळी महेश इंगळे यांनी डॉ. गणेश करे-पाटील यांना दिली. कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून देवस्थान समितीचे विश्वस्त तथा करमाळा पंचायत समितीचे माजी उपसभापती भारतराव शिंदे पाटील, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गणेश करे-पाटील, प्रयोगशील शेतकरी नितीन तकिक पाटील, आजी-माजी सैनिक संघटनेचे करमाळा तालुका अध्यक्ष मेजर अक्रूर शिंदे, सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, जीवन शिक्षण फाउंडेशनचे संस्थापक प्रा. जयेश पवार यांची उपस्थिती होती. प्रसिद्ध निवेदक प्रा.विष्णु शिंदे, उदयोन्मुख पक्षीमित्र विराज साळुंके व अभयसिंह निंबाळकर यांचीही उपस्थिती लक्षणीय होती.